


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे




✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक ३४ वा. ✻ शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 34 ✻ Friday 18 July 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

# देशात दुसऱ्या क्रमांकावर कराड नगरपालिका

## ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ मधील राष्ट्रीय पुरस्कार शानदार कार्यक्रमात वितरण; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरव



नवी दिल्ली/कराड - स्वच्छतेच्या अभियानात सातत्याने उच्च दर्जाची कामगिरी बजावणाऱ्या कराड नगरपालिकेने ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ मध्ये देशात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. ५० हजार ते ३ लाख लोकसंख्या गटात कराडने देशात दुसरा क्रमांक पटकावला.

हा राष्ट्रीय सन्मान १७ जुलै २०२५ रोजी नवी दिल्लीच्या विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सोहळ्यासाठी नगर विकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, आरोग्य निरीक्षक मुकेश अहिवळे यांनी पुरस्कार स्वीकारला. दरम्यान यावेळी अभियंता संदीप रणदिवे, शहर समन्वयक आशिष रोकडे, कर्मचारी प्रतिनिधी फैयाज बारगीर, शेखर लाड, किरण कांबळे, अशोक डाईगडे, संजय चावरे व स्वप्नील सरगडे उपस्थित होते. कराड नगरपालिकेने पुन्हा एकदा देशात स्वच्छतेत अग्रक्रमावर असल्याचे सिद्ध केले आहे. यामुळे कराडमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कराड नगरपालिकेने गतकाळात स्वच्छ सर्वेक्षण मध्ये केलेली कामगिरी खालील प्रमाणे आहे. २०१९ : देशात पहिला क्रमांक २०२० : देशात पहिला क्रमांक, २०२१ : सहावा क्रमांक, २०२२ : तिसरा क्रमांक, २०२३ : चौथा क्रमांक, दरम्यान २०२४ : पुन्हा अव्वल दुसऱ्या क्रमांकावर स्थान मिळवले आहे.

या सातत्यपूर्ण यशामुळे कराड शहराची देशपातळीवर मान उंचावली असून, नगरपालिकेच्या योजनाबद्ध प्रयत्नांना आणि नागरिकांच्या सहकार्याला मिळालेली ही मोठी पोचपावती आहे.

**स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये कराड नगरपरिषदेला देशपातळीवर दुसरा क्रमांक मिळालेला आहे. या मोठ्या यशाचे श्रेय नगरपरिषदेचे सर्व आरोग्य कर्मचारी पदाधिकारी व विभाग प्रमुख यांचे आहे. त्याचप्रमाणे सर्वात महत्त्वाचे म्हणजे कराड शहरातील नागरिकांनी दिलेला प्रतिसाद त्यामुळे हे यश संपादित करता आले. आरोग्य कर्मचाऱ्यांनी सातत्यपूर्ण मेहनतीमुळे कराड नगरपरिषदेने हा गौरव मिळवलेला असून नागरिकांनी इथून पुढे असेच सहकार्य करावे पुढल्या वर्षीही असेच दैदीप्यमान यश संपादन करु. असा विश्वास कराडचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला.**

## उद्योग व व्यवसाय वृध्दींगतसाठी पोलीस दल सहकार्य करेल : तुषार दोशी



सातारा - सातारा जिल्ह्यातील सर्व ठिकाणचे उद्योग व व्यवसाय अधिक चांगल्यारितीने वृध्दंगत करण्यासाठी सातारा जिल्हा पोलील दल सदैव तत्पर राहून सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासन पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी दिले.

सातारा जिल्ह्यातील विविध औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या पोलीस विभागाशी संबंधित असलेल्या समस्या व अडीअडचणी व त्यावर करावयाच्या योजनांच्या संबंधाने पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्या अध्यक्षतेखाली अलंकार हॉल सातारा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर, सातारा उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले, कराड उपविभागीय अधिकारी अमोल ठाकुर, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे, महाराष्ट्र औद्योगिक संघटनेचे (मास) अध्यक्ष संजोग मोहीते, उपाध्यक्ष अनुप मुथा, सचिव दिपक पाटील उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यातील उद्योजकांनी मांडलेल्या अडचणींबाबत सातारा जिल्हा पोलीस दलाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनेबाबत पोलीस अधीक्षक श्री. दोशी यांनी चर्चा करुन डायल ११२ बाबत माहिती देऊन याचा जास्तीत जास्त वापर करण्यास सांगितले. आद्यौगिक परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कक्षेत आणण्याबाबत सूचना दिल्या. या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेबाबत अंतर्गत सुरक्षा समिती स्थापन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पोलीस दलाकडून निर्भया पथकाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात येतील असे आश्वासनही श्री. दोशी यांनी दिले.

मुख्यत: उद्योजकांनी औद्योगिक परिसरामध्ये पोलीस गस्त नेमणे, पोलीस चौक्या स्थापन करण्यासह इतर अडचणी सोडविणसाठी पोलीस अधीक्षक श्री. दोशी यांना विनंती केली होती. पोलीस अधीक्षक श्री. दोशी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीस सातारा शहर, सातारा तालुका, बोरगाव, खंडाळा, शिरवळ, वाई, लोणंद, फलटण ग्रामीण, कोरेगाव, पाटण, उब्रंज, तळबीड यांचे प्रभारी अधिकारी व अमंलदार व जिल्हा विशेष शाखेतील अंमलदार यांच्यासह पार्ले, कमिन्स, यशराज इथेनॉल, गरवारे, बोकालाईट फुड, पारखीप्लास्ट, क्युबील्ट यांच्यासह ९० पेक्षा जास्त उद्योजक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कराड येथे २२ जुलैला रोजी रोजगार मेळावा होणार


कराड : जागतिक युवा कौशल्य सप्ताहानिमित्त सातारा जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांसाठी २२ जुलै रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सातारा व शिक्षण मंडळ, कराड संचालितक महिला महाविद्यालय, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महाविद्यालय, कराड येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

याचा बेरोजगार उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांनी केले आहे.

या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, पदवीधर, आयटीआय सर्व ट्रेड, डिप्लोमा, इंजिनिअर, कुशल व अर्धकुशल कामगार अशा प्रकारचे १५०० जास्त रिक्तपदे https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अधिसूचित केलेली आहेत. तरी नोकरी इच्छुक उमेदवारांनी २२ जुलै रोजी आपले शैक्षणिक कागदपत्रे घेऊन प्रत्यक्ष उपस्थित राहावे. मेळाव्यात सहभागी झालेल्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत. याबाबत काही अडचण असल्यास कार्यालयाच्या ०२१६२-२३९९३८ या दुरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले आहे.

## कोयना सहकारी बँकेची बिनविरोध निवडणूक

### युवानेते आदिराज पाटील संचालकपदी



कराड : कोयना सहकारी बँक संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीसाठी बिनविरोध पार पडली. या निवडणुकीत युवानेते आदिराज पाटील (उंडाळकर) यांच्यासह १५ संचालकांची बिनविरोध निवड झाली.

बँकेच्या संचालकामध्ये आदिराज तुकाराम डुबल, हणमंत पाटील यांच्या निवडीमुळे देसाई, बाळासाहेब जाधव, बँकेच्या व्यवस्थापनात नव्या राजकुमार पाटील, सुजित थोरात, कृष्णत पाटील, साहेबराव शेवाळे, महादेव पाटील, सागर जाधव, सीमा पाटील, रेश्मा पाटील, संपत बडेकर, नदीम सुतार आणि लालासाहेब गिरी यांचा समावेश आहे.

पिढीचे प्रतिनिधित्व झाले असून, नवदृष्टी, तंत्रज्ञानाचा वापर आणि तरुणाईच्या सहभागातून नव्या योजना राबवण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

ॲड. उदयसिंह पाटील यांनी नवनिर्वाचित संचालकांचे स्वागत करत सहकार मूल्यांनुसार पारदर्शक कारभार व ग्राहकहितासाठी नवीन सुविधा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

**१९९६ मध्ये स्व. विलासकाका पाटील आणि ॲड. उदयसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या बँकेने आर्थिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून, सातत्याने ‘अ’ ऑडिट वर्ग प्राप्त करत रिझर्व्ह बँकेचे सर्व निकष वेळेवर पूर्ण केले आहेत.**

## उंब्रजमधील बंद सीसीटीव्ही यंत्रणा त्वरित पूर्ववत करा

### शिवसेना (शिंदे गट)चा इशारा



### ग्रामपंचायतीकडे निवेदन; अन्यथा आंदोलनाचा इशारा

उंब्रज : कराड तालुक्यातील उंब्रज गावातील बंद अवस्थेतील सीसीटीव्ही प्रणाली तातडीने पूर्ववत करावी अन्यथा उग्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शिवसेना (शिंदे गट)च्या वतीने उंब्रज ग्रामपंचायतीला देण्यात आला आहे. यासंदर्भातील निवेदन ग्रामविकास अधिकारी समाधान माने यांनी स्वीकारले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गावाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून उंब्रजमध्ये सुमारे ३६ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित केले होते. मात्र, गेली दोन वर्षे हे सर्व कॅमेरे बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे चोरी, महिलांची छेडछाड, दरोडे, अपहरण, खून यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची शक्यता वाढली आहे.

कॉलेज रोड परिसरात देखील सीसीटीव्ही नसल्यामुळे काही युवकांनी धूमशैलीत दुचाकी चालवून महिला आणि विद्यार्थिनींना त्रास देण्याचे प्रमाण वाढल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थिनींना असुरक्षिततेत शिक्षण घ्यावे लागत असल्याची तक्रारही करण्यात आली.या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने तातडीने सीसीटीव्ही यंत्रणा पूर्ववत करावी, अन्यथा शिवसेना (शिंदे गट)कडून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. सदर निवेदनावर रवि हजारे, सचिन जाधव, अतुल पाटील, विक्रम वाघमारे, विठ्ठल जाधव, सुहास देशमाने, निलेश भोसले, विशाल शेजवळ, निलेश संकपाळ, महेश जाधव यांच्यासह अनेक शिवसैनिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ट्रान्झिट कॅम्पमधील रहिवाशांना दिलासा देण्यासाठी कायदा करणार-मंत्री उदय सामंत



मुंबई : मुंबईमध्ये अनेक चाळी आणि वसाहतींचा पुनर्विकास होत आहे. या पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांना ट्रान्झिट कॅम्पमध्ये ठेवण्यात येते. या ट्रान्झिट कॅम्पचे भाडे तसेच प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याबाबत लवकरच कायदा करणार, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली.

सदस्य शशिकांत शिंदे यांनी ताडवाडी येथील बीआयटी इमारतीच्या पुनर्वसन प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. यावेळी सदस्य प्रवीण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री श्री.सामंत म्हणाले की, बिल्डर काम घेतो पण त्या कामाकडे फिरकत नाहीत असे प्रकार घडत आहेत. तसेच रहिवाशांना ट्रान्झिट मध्ये टाकत असून भाडं देण्याचे आश्वासन देतात. पण भाडं देत नाहीत. त्यासाठीच कायदेशीर तरतूद करण्याचा विचार आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळेल. सध्या ट्रान्झिट कॅम्पचे भाडे किती असावे याचे नियमन नाही. त्याचाही या कायद्यात समावेश असेल असेही मंत्री सामंत यांनी सांगितले. बिडीडी चाळीला लावलेले नियम या सगळ्या रहिवाशांना लागू करण्यात येतील, जेणेकरून त्यांना अजून चांगल्या पद्धतीच्या सुविधा मिळू शकतील. या संदर्भात मुख्यमंत्री बैठक घेणार आहेत. तसेच बीआयटी चाळीच्या पुनर्वसनाबाबत सभापतींच्या दालनात बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल, असेही मंत्री श्री.सामंत यांनी सांगितले.

## महाराष्ट्रात तुकडेबंदी कायदा रद्द

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९४७ चा तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे रहिवाशी क्षेत्रातील अनधिकृत तुकड्यांना अधिकृत करण्यासाठी पुढील १५ दिवसांत महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि संबंधित अधिका-यांद्वारे नवी कार्यपद्धती (एसओपी) तयार केली जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. तुकडेबंदी कायदा रद्द केल्यामुळे १ जानेवारी २०२५ पूर्वीच्या एक हजार चौरस फुटांवरील जमिनींना कायदेशीर मान्यता आता मिळणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरण आणि गौण खनिज चोरीविरुद्ध कठोर कारवाईसाठी एसओपी तयार केली जाणार आहे. राज्यात कृत्रिम वाळूच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ५० नवीन क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. एम-सँडला उद्योगाचा दर्जा देण्यात आला असून यामुळे उद्योगांना सर्व सुविधा उपलब्ध होतील. स्वामित्वधन ४०० रुपये प्रति ब्रासवरून २०० रुपये करण्यात आली आहे. उद्योगमंत्र्यांच्या सहकार्याने जिल्हाधिका-यांनी याबाबत बैठका घ्याव्यात असे आवाहन बावनकुळे यांनी यावेळी केले.

## यूपी पोलिसांच्या एन्काउंटरमध्ये २३८ गुन्हेगार ठार

लखनौ : उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांचे सरकार आल्यापासून राज्यातील गुन्हेगारांविरोधात यूपी पोलिसांची तीव्र कारवाई सुरुच आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार, गुन्हेगारीबाबत झिरो टॉलरन्स धोरणांतर्गत गुन्हेगार/गुन्हेगारांविरुद्ध सातत्याने कठोर कारवाई केली जात आहे. २०१७ पासून पोलिसांनी २३८ गुन्हेगारांना चकमकीत ठार केले आहे, तर ९ हजारांहून अधिक गुन्हेगार गोळीबारात जखमी झाले आहेत. सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ३० हजारांहून अधिक गुन्हेगारांना अटक करुन तुरुंगात पाठवले आहे. तर, ९,४६७ गुन्हेगारांच्या पायाला गोळ्या लागल्या. सर्वाधिक कारवाई मेरठ झोनमध्ये झाली. योगी सरकार कायदा आणि सुव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी कठोर पावले उचलत आहे. मुख्यमंत्री योगी यांच्या नेतृत्वाखाली, गेल्या आठ वर्षांत यूपी पोलिस गुन्हेगारी आणि गुन्हेगारांविरुद्ध झिरो टॉलरन्स धोरणांतर्गत सतत कारवाई करत आहेत.

## संपादकीय....

# मराठी माणसाचे स्वप्न पूर्णत्वाकडे!

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांचे पुनर्वसन शक्यतेकडे असा विश्वास निर्माण झाला आहे. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी. संपूर्ण देशाचे लक्ष या शहरावर केंद्रित असते. मुंबईने लाखो लोकांना आश्रय दिला, पण या झगमगाटामध्ये मूळ मुंबईकर, विशेषतः मराठी माणूस मात्र हळूहळू शहराच्या कडेलोटाला गेला. वाढती घरांची किंमत, रखडलेले पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्ट्यांचे नियोजनशून्य व्यवस्थापन आणि त्यातून निर्माण झालेले स्थलांतर-हे सगळे घटक मराठी माणसाच्या हक्काच्या जागेवर अडथळा ठरले. पण ही स्थिती आता बदलत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने या समस्यांचा गांभीर्याने विचार करून ठोस पावले उचलली आहेत. मुंबई मराठी माणसाची आहे आणि ती मराठी माणसांचीच राहिली पाहिजे हा निर्धार त्यांनी सातत्याने व्यक्त केला आहे आणि त्यासाठी प्रत्यक्ष कृतीशील राहिले आहेत. मुंबईत अनेक झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे रखडलेले आहेत. या प्रकल्पांमध्ये राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना वर्षानुवर्षे तात्पुरत्या घरांमध्ये किंवा भाड्याच्या जागांमध्ये अडकून राहावे लागत होते. या रखडलेल्या योजनांना गती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत स्वतः पुढाकार घेतला असून मुंबई महापालिका, आणि संबंधित विकासकांसोबत थेट समन्वय साधून निर्णय प्रक्रिया वेगवान केली आहे. त्याचा सकारात्मक परिणामही दिसू लागला आहे. वरळी येथील पुनर्विकास प्रकल्पांतर्गत ५५६ सदनिकांचे वाटप १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, अशी अधिकृत घोषणा नुकतीच झाली आहे. ही केवळ एक सुरुवात असून अशा अनेक प्रकल्पांना गती देण्याची योजना आहे. मुंबईत घर मिळणे हे सर्वसामान्य मराठी माणसासाठी स्वप्नासारखे झाले आहे. एकेकाळी गिरणी कामगार, सरकारी कर्मचारी आणि मध्यमवर्गीय मराठी कुटुंबे सहजगत्या मुंबईत राहात होती. मात्र आज त्यांना ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूरपर्यंत स्थलांतर करावे लागत आहे. या स्थलांतरित मराठी बांधवांना पुन्हा मुंबईत परत आणण्याचा निर्धार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. यासाठी सरकारने परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करण्याचे धोरण राबवण्यास सुरुवात केली आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प, म्हाडाच्या योजनांतर्गत घरांचे आरक्षण आणि धोरणात्मक पातळीवरील सवलती यांच्या माध्यमातून मराठी माणसाला मुंबईत पुन्हा घर मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.मराठी माणसाचा हक्काचा आवाज गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेने बुलंद केला आहे. मुंबई मराठी माणसांची आहे या घोषणेमुळे एक वैचारिक दिशा लाभली आणि ही भावना जनतेत खोलवर रुजली. याच विचारांची चालना पुढे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दिली. शिवसेना आणि मनसे या दोन्ही पक्षांनी वेगवेगळ्या मार्गांनी, पण एकाच ध्येयासाठी-मराठी अस्मिता आणि स्थानिक हक्क यासाठी आवाज उठवला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील शिवसेनेच्या मूळ विचारांचे प्रतिनिधी आहेत. ते केवळ राजकीय नेतृत्व न करता सामाजिक प्रश्नांवरही संवेदनशील आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारंवार स्पष्ट केले आहे की, मराठी माणसाचे स्वप्न आम्ही पूर्ण करू. मुंबईबाहेर गेलेल्यांना पुन्हा इथेच जागा मिळवून देऊ. मुंबई ही देशाचे ग्रोथ इंजिन मानली जाते. या शहरात दररोज हजारो कोटींची उलाढाल होते. देश-विदेशातील कंपन्या येथे कार्यालये स्थापन करतात. रोजगाराच्या संधींचे हे मुख्य केंद्र आहे. पण या घडामोडींमध्ये स्थानिक मराठी युवक मागे पडू नये म्हणून सरकारने धोरणात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. शिक्षण, व्यवसाय, स्टार्टअप्स, एमएसएमई योजना यामार्फत स्थानिक तरुणांना सक्षम करण्याची योजना आखण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांचे संपूर्ण राजकीय आयुष्य मराठी माणसाच्या न्यायहक्कासाठीच्या लढ्यात गेले आहे. त्यांनी झोपडपट्टीमधील लोकांच्या प्रश्नांपासून ते उच्चभ्रू पुनर्विकासातील अन्यायापर्यंत अनेक मुद्द्यांवर आवाज उठवला आहे. आता उपमुख्यमंत्री या नात्याने त्यांच्याकडे अधिक अधिकार आहेत आणि त्यांचा योग्य उपयोग करत ते शासन निर्णयांच्या माध्यमातून ठोस बदल घडवून आणत आहेत. मुंबईसारख्या जागतिक शहरामध्ये मराठी माणसाला हक्काची जागा मिळावी, त्याचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी सरकार स्तरावर नवे बदल होत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ध्यास, सरकारची नियोजनबद्ध कृती आणि पुनर्विकास प्रक्रियेला मिळणारी गती यामुळे हे स्वप्न लवकरच साकार होईल, अशी आशा सर्वसामान्य मराठी माणसाला वाटू लागली आहे.

# सद्गुणसंपन्न राष्ट्रनिर्मितीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे : सुनिलबापू लाड

## गडकोट मोहिम, दुर्गामाता दौड, विवेकसभेचे महत्त्व अधोरेखित



कराड : शिष्याच्या अंतःकरणात स्वत्व जागवणारा गुरूच खरा सद्गुरू असतो. शिवरायांच्या जीवनात ही शिकवण राष्ट्रनिर्मितीचे अधिष्ठान ठरली. छत्रपती संभाजीराजेंच्या बलिदानातून देशासाठी कसे मरावे, हे आपणास शिकायला मिळाले. आजही संभाजी भिडे गुरुजी या आदर्शांचे जतन करून तरुणांमध्ये देव, देश, धर्म आणि राष्ट्रासाठी जगण्याची प्रेरणा देत आहेत. त्यानुसार शिवशंभू छत्रपतींनी सांगितलेल्या सद्गुणांच्या आधारावर युवकांना राष्ट्र उभारणीचे व्रत घ्यावे लागेल, असे स्फूर्तीदायी विचार ज्येष्ठ धारकरी व कीर्तनकार सुनिलबापू लाड यांनी व्यक्त केले.

श्री शिवप्रतिष्ठान, हिंदुस्तान कराड-पाटण विभागाच्यावतीने गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक के. एन. देसाई होते, तर खंडाळे काका प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सुनिलबापू लाड म्हणाले, शिवराय हे केवळ राजे नव्हते, तर ते राष्ट्र उभारणीसाठी आवश्यक असलेली नीती, धर्म आणि शौर्य यांचे मूर्तिमंत रूप होते, असे सांगताना त्यांनी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे, राष्ट्रमाता जिजाऊ आणि त्यांच्याच प्रेरणेतून घडलेले संभाजीराजे यांचे कार्य व जीवनमूल्य उलगडून दाखवले. प्रभू श्रीराम वशिष्ठ ऋषींच्या मार्गदर्शनात घडले; अर्जुनाने श्रीकृष्णाच्या उपदेशाने धर्मपराक्रम केला; तसेच शिवशंभू छत्रपतींना त्यांच्या गुरूपरंपरेची शिकवण लाभली. ही शिकवणच त्यांच्या राष्ट्रनिर्मितीमागे असलेली आत्मिक शक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा कार्यवाह सागर आमले यांनी छत्रपतींच्या विचारांनी युवक घडवण्याच्या गुरुजींच्या कार्यात सहभागी होणे, हीच खरी गुरुदक्षिणा असल्याचे सांगितले. यावेळी कराड-पाटण विभागातील धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट

मुंबई : राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे भेट घेतली.

यावेळी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील हरेगावातील शेतकऱ्यांना जमीन वाटप प्रकरणासंदर्भात त्यांनी राज्यपालांना निवेदन सादर केले.

# चाफळ फाटा येथे गाईवर जीवघेणा हल्ला

## गाय गंभीर जखमी; गोशाळेत दाखल करण्याची मागणी



उंब्रज : कराड तालुक्यातील चरेगाव परिसरातील चाफळ फाटा येथे अज्ञात व्यक्तींनी भटक्या गाईवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली असून सदर गाय गंभीर जखमी झाली आहे. या घटनेची दखल घेत स्थानिक गोरक्षक व प्राणीमित्र संघटनांनी गाईवर तातडीने उपचार करून तिला गोशाळेत हलवण्याची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खालकरवाडी परिसरात भटक्या गाई व वळूंचा मुक्तपणे वावर असून ते अनेकदा शेतकऱ्यांच्या पिकांमध्ये घुसून नुकसान करतात. यामुळे त्रस्त शेतकऱ्यांतून कधी कधी रागाच्या भरात जनावरांवर हल्ल्याचे प्रकार घडतात. गेल्या आठवड्यात अशाच एका हल्ल्यात गाईच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून पाठीमागील खुबाही जखमी झाला आहे.

या घटनेनंतर परिसरात संताप व्यक्त केला जात असून, एकीकडे शेतकऱ्यांचे पीक नुकसान, तर दुसरीकडे मुक्या प्राण्यांवर होणारे अत्याचार, हे दोन्हीही असह्य बनले आहेत. या समस्या सोडवण्यासाठी भटक्या जनावरांचे पुनर्वसन अत्यावश्यक असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

सामाजिक कार्यकर्ते रविराज माने म्हणाले, शेतकऱ्यांचे नुकसान थांबवणे गरजेचे आहे, पण त्याचबरोबर मुक्या जनावरांचा जीव वाचवणे हेही आपले कर्तव्य आहे. जखमी गाईच्या स्थलांतरणासाठी गोरक्षकांनी पुढाकार घ्यावा, आम्ही स्थानिक त्यांच्या मदतीला तयार आहोत. गाईवर हल्ला करणारे अज्ञात आरोपी कोण आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी काय उपाय योजले जातील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पाटण तालुक्यात शासकीय क्रीडासंकुल उभारण्याची मागणी

## शेतकरी सेनेचे विकास हादवे यांचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांना निवेदन



पाटण : दुर्गम आणि डोंगराळ भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाटण तालुक्यातील युवक विविध क्षेत्रांत यश मिळवत असताना, भविष्यात राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडवण्यासाठी येथे शासकीय क्रीडासंकुल उभारण्यात यावे, अशी मागणी शिवसेना (शेतकरी सेना) प्रणित शेतकरी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष विकास हादवे यांनी केली आहे.

राज्याचे पर्यटन व सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभुराज देसाई यांच्याकडे त्यांनी यासंदर्भात लेखी निवेदनाद्वारे ही मागणी सादर केली. निवेदनात म्हटले आहे की, पाटण तालुका धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा लाभलेला असून जैवविविधतेने समृद्ध आहे. मात्र, दुर्गमतेमुळे हा भाग अनेक वेळा दुर्लक्षित राहिला आहे. तरीही येथील तरुण-तरुणींनी विविध क्षेत्रांत भरती होऊन यश संपादन केले आहे. क्रीडाक्षेत्रातही पाटण तालुक्यातील युवक-युवती संसाधनांच्या अभावातही उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. येथे अद्याप कोणतेही शासकीय क्रीडा प्रशिक्षण केंद्र किंवा सुसज्ज क्रीडांगण उपलब्ध नाही. अशा परिस्थितीतही खेळाडू घडत आहेत ही बाब लक्षात घेता, शासकीय क्रीडासंकुल उभारल्यास येथून राष्ट्रीय खेळाडू घडू शकतील, असे हादवे यांनी नमूद केले आहे.या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी अपेक्षाही हादवे यांनी निवेदनाच्या शेवटी व्यक्त केली आहे.

# दीड लाख गोविंदांना विमा कवच मिळणार

मुंबई : मुंबईसह ठाणे आणि रायगडमध्ये प्रचंड लोकप्रिय असलेला दहिहंडीचा सण महिन्याभरावर आला आहे. सर्व गोविंदा पथके जोरदार तयारीला लागली असून त्यांचा सराव सुरू आहे. अशातच महाराष्ट्र सरकारकडून गोविंदांना एक खुशखबर मिळाली आहे. शासनाकडून गोविंदांना मिळणा-या विमा कवचात वाढ करुन ते सुमारे दीड लाख गोविंदांना देण्यात यावे, अशी मागणी करत आज दहिहंडी समन्वय समितीने मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. शिष्टमंडळात महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण पडेलकर, गीता झगडे आणि पदाधिकारी सहभागी झाले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी यासंबंधीचे निर्देश दिले.

# सभागृहात कायदा, सुव्यवस्थेवर चर्चा, लॉबीत राडा

मुंबई : भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्ष आज हाणामारीपर्यंत पोचला. विधानभवनाच्या लॉबीत पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना मारहाण केल्याने विधानभवनात एकच गोंधळ उडाला. विधानभवनात गुंड आणून मारहाण केली जात असेल, आमदारही सुरक्षित नसतील तर राज्य कोणत्या दिशेने चाललेय ? असा संतप्त सवाल विरोधकांनी केला. काही लोकांना सत्तेची मस्ती आली आहे. आपणास यापूर्वीही जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. हे गुंडही आपल्याला मारण्यासाठीच आले होते असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला. आपण या घटनेचा अहवाल मागवला असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल असे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

लोकशाहीचे राज्यातील सर्वोच्च सभागृह म्हणून ओळखल्या जाणा-या विधानभवनाच्या प्रतिष्ठेला काळिमा फासणारी घटना आज घडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू आहे. काल विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर त्यांच्यात अर्वाच्य शिवीगाळ झाली होती. आज त्याही पुढे जात थेट विधानभवनाच्या इमारतीत, लॉबीत पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना मारहाण केल्याने एकच खळबळ उडाली. विधानभवनाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील लॉबीत झालेल्या या घटनेमुळे सगळेच आवाक झाले. सुरक्षारक्षकांनी तत्काळ धाव घेऊन हाणामारी रोखली. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना बाजूला केले. काल शिवीगाळ, आज हाणामारी करणारे हे नेते उद्या कोणत्या थराला जाणार अशी चिंता वरिष्ठ नेत्यांनी व्यक्त केली.

**अहवाल मागवला, कारवाई करणार**

लॉबीत घडलेल्या घटनेची माहिती भाजप आमदार संजय उपाध्याय, राष्ट्रवादीच्या सना मलिक यांनी विधानसभेत दिली. तेव्हा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आपण या घटनेचा अहवाल मागवला आहे. सर्व माहिती आल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल असे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करताना अध्यक्ष व सभापती यांच्या अधिकारक्षेत्रात विधानभवन येत असल्याने त्यांना दोषींवर कारवाई करण्याची विनंती आपण केली असल्याचे सांगितले.

**विरोधकांचा संताप**

विधानसभेत आमदार सुरक्षीत नसतील तर कशाला आमदार म्हणून राहायचं असा संतप्त सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला. जर तुम्ही विधानसभेत गुंडाना प्रवेश देणार असाल आणि ते हल्ले करणार असतील तर कोणीही सुरक्षीत नाही. मला शिव्या दिल्या आहे.

कुत्रा, डुक्कर, तुला मारुन टाकू अशा धमक्या दिल्याचे आव्हाड म्हणाले. मलाच मारण्यासाठी सगळे आले होते असा आरोप आव्हाड यांनी केला. विधानसभेत आमदार सुरक्षीत नसतील तर कशाला राहायचे आमदार? असा संतप्त सवाल यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. शिवसेना(उबाठा)पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही या प्रकाराबद्दल तीव्र संताप व्यक्त करताना गुंडांना विधानभवनात आणून हाणामा-या केल्या जात असतील तर राज्यात कायदा व सुव्यवस्था शिल्लक आहे का ? असा प्रश्न पडतो. मुळात या गुंडांना विधानभवनात येण्यासाठी प्रवेशिका कोणी दिल्या. या सगळया बाबींची चौकशी केली गेली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

**पडळकरांनी माफी मागितली**

हाणामारी झाल्यानंतर आ. गोपीचंद पडळकर विधानभवनातून निघून गेले होते. परंतु महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना परत बोलावून घेतले. त्यांच्या दालनात जाण्यापूर्वी पडळकर यांनी प्रसारमाध्यमांसमोर येऊन झालेल्या घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली. जी घटना झाली ती दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले.

# राज्यात पाच महिन्यात १ लाख ६० हजार गुन्हे

मुंबई : राज्यात गुन्हेगारी, भ्रष्टाचार शिखरावर पोहोचला असून कायदा सुव्यवस्था ढासळली आहे, अशा शब्दात विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी महायुती सरकारच्या कारभारावर टीकेचे आसूड ओढले. स्पर्धक कंपनीपेक्षा ३ हजारांहून अधिक कोटींची बोली बोलल्यानंतरही मेघा इंजिनिअरिंग कंपनीला ठाणे बोरिवली बोगद्याचे काम देणे, शालार्थ आयडी घोटाळयावर पांघरूण घालणे यावरून सरकारला खडे बोल सुनावतानाच शेतकरी आत्महत्यांसह अनेक प्रश्नांवरून दानवे यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

मागील पाच महिन्यात १ लाख ६० हजार गुन्हे राज्यात घडले. ९२४ हत्या झाल्या असून दररोज ६ हत्या होतात. तर ३ हजार ५०६ बलात्कार झाले. या घटनांमध्ये जवळचे लोकं एवढे हिंमत का करतात? असा संतप्त सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

मुख्यमंत्री यांच्या नागपूर जिल्ह्यात १० हजार ४०० गुन्ह्यांची नोंद झाली आहे. पुणे संभाजीनगर, नाशिक येथे अनेक मोठे गुन्हे दाखल झाले आहेत. गुन्हेगारीत महाराष्ट्र १० क्रमांकावर आहे. पुण्यात मोठ्या प्रमाणावर टोळया सक्रीय असून भाईगिरी सुरू आहे असा दावाही त्यांनी केला.

अनेक विभागात भ्रष्टचार वाढला आहे. प्रचारात स्वच्छ प्रशासन म्हणतात मात्र दररोज घोटाळे बाहेर येतात. सत्ताधारी मंत्री भ्रष्टाचार करत असताना काय करणार असा प्रश्न उपस्थित केला. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून राज्यात कायदा सुव्यवस्था राखण्यास सरकारला अपयश आल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. तसेच सरकारमधील मंत्र्यांचे समोर आलेल्या विविध घोटाळ्यांबाबत दानवे यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. * संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा

सातारा : याप्रमाणे भात, खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी, भुईमूग, सोयाबीन, मूग, उडीद व खरीप कांदा या ९ पिकांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू आहे. १५ जुलै अखेर जिल्ह्यातील केवळ २४०० शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदविला आहे.

जिल्ह्यामध्ये पावसाच्या संततधारेमुळे बहुतांश ठिकाणी मशागतीची व पेरणीची कामे खोळंबली आहेत. ज्या ठिकाणी पेरणी झालेली आहे. तेथील पिकाचे सततच्या पावसाने नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नैसर्गिक आपत्ती, कीड, रोग, इत्यादी कारणाने नुकसान झाल्यास शेतकऱ्याचे स्थैर्य अबाधित राखण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ जुलै अखेर या प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन साताराचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अजय शेंडे यांनी केले आहे. बिगर कर्जदार शेतकरी वैयक्तीकरित्या आपले अर्ज विमा कंपनीस सादर करुन अथवा विमा कंपनीच्या संकेतस्थळाद्वारेही या योजनेत सहभागी होऊ शकतील योजनेत सहभागी योजण्यासाठी आवश्यक विहीत नमुन्यातील अर्ज बँकेकडे व विमा कंपनीकडे उपलब्ध असून शेतकऱ्यांनी ज्या राष्ट्रीयकृत अथवा जिल्हा मध्यवर्ती बँकेत आपले खाते आहे. त्या बँकेत जाऊन अथवा पोस्ट कार्यालय, विमा कंपनी एजंट किंवा सर्वाजनिक सुविधा केंद्र व विमा कपंनीच्या संकेतस्थळाद्वारे ३१ जुलै २०२५ पूर्वी हप्ता भरावा. अधिक माहिती साठी गावपातळीवरील सहाय्यक कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहनही जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# मानवतेसाठी समर्पित मानवता कमल सेवा छत्रचे उल्लेखनीय कार्य

पुण्यात कार्यरत असलेली मानवता कमल सेवा छत्र ही कमल फाउंडेशनची संकल्पना समाजातील दुर्लक्षित, वृद्ध, दिव्यांग, अनाथ आणि प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगणाऱ्या घटकांसाठी एक आशेचा किरण ठरत आहे. समाजात या घटकांकडे अनेकदा दुर्लक्ष होते. त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याची काळजी घेणारे संस्थात्मक व्यवस्थापन फारसे दिसून येत नाही. या पार्श्वभूमीवर धनराजसिंग चौधरी यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या कमल फाउंडेशनने मानवी संवेदनांची उंची गाठली आहे.

या संस्थेमार्फत सुरू करण्यात आलेल्या वृद्धाश्रमात वृद्धांना प्रेम, सुरक्षा व स्वातंत्र्य यांचा मान राखून जगता येते. त्यांच्याशी प्रेमळ, भावनिक संवाद साधत त्यांच्या आयुष्यातील एकटेपणा दूर केला जातो. यासोबतच दिव्यांग आणि आजारी व्यक्तींना केवळ वैद्यकीय मदतच नव्हे, तर मानसिक



आधार, आत्मविश्वास आणि आत्मिक समाधान मिळेल असे वातावरण तयार केले गेले आहे.

धनराजसिंग चौधरी यांचा विशेष दृष्टिकोन म्हणजे सरकार किंवा कोट्यवधींच्या मदतीची वाट न पाहता स्थानिक पातळीवर थेट मदत पोहोचवणे. सतत काही वर्षांपासून २४ तास वैद्यकीय सुविधा, धार्मिक आणि मानसिक स्वास्थ्य वृद्धिंगत करणारे उपक्रम, तसेच स्वच्छ, सुरक्षित निवास हे संस्थेचे वैशिष्ट्य ठरले आहे.मानवतेला चालना देणाऱ्या अशा उपक्रमांना समाजातील सर्वांनी साथ दिली, तर एक जबाबदार, संवेदनशील आणि समतोल समाज घडवणे शक्य आहे. कमल फाउंडेशनचा हा प्रयत्न नक्कीच प्रेरणादायी आहे. वृद्धाश्रम हे कमल फाउंडेशनचे मानवता कमल सेवा छत्रमध्ये समाधानी जीवन जगण्याचे एकमेव ठिकाण आहे. निराधार, अंथरुणात खिळलेल्या वृद्ध व गरजू दिव्यांग रुग्णांची काळजी घेतली जाते. वैयेक्तिक लक्ष व २४ तास वैद्यकीय मदत पुरवली जाते. स्वच्छ अन्न, जल, वस्त्र आणि निवारा याची सोय असून सुरक्षित आणि निरोगी वातावरण निर्माण करण्यात आलेले आहे.

**संपर्क: धनराजसिंग चौधरी (संचालक)–७०६६८८३३२२**

**पत्ता : सेक्टर २७, प्लॉट ब, गजानन महाराज मंदिरा समोर, निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४**

# पर्यटनाच्या नवीन योजनांमुळे शहरातही मिळणार टुरीस्ट होम

सातारा – पर्यटन संचालनालयांतर्गत पर्यटन व्यवसायाला प्रोत्साहन देण्याकरीता विविध योजना राबविण्यात येतात. देश-विदेशातील पर्यटकांच्या निवास व्यवस्थेकरीता टुरीस्ट होम, होम स्टे, पर्यटन व्हिला, पर्यटक अर्पाटमेंट इत्यादी बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याकरीता पर्यटन संचालनालय, पुणे विभागामार्फत नोंदणीसाठी अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या विभागातील नागरीकांनी तसेच पर्यटक व्यवसायिकांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन पुणे विभागाच्या प्र. उपसंचालक श्रीमती शमा पवार यांनी केले आहे.

पर्यटन संचालनालय, मुंबईचे संचालकांनी दिलेल्या निर्देशानुसार नव्याने चालू केलेल्या टुरीस्ट होम, होम स्टे, पर्यटन व्हिला, पर्यटक अर्पाटमेंट या योजनेच्या माध्यामातून व्यवसायाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. देश-विदेशातून महाराष्ट्रात येणाऱ्या पर्यटकांना शहारातील जीवनशैली, संस्कृती आणि परंपरा यांना जवळून अनुभवता येणार आहे. तसेच स्थानिक स्वयंपाक, मराठमोळे पाहुणचार व कुटुंबातील गप्पा गोष्टींमुळे पर्यटकांचा प्रवास अधिक संस्मरणीय होईल. अधिक माहितीसाठी ८०८००३५१३४ संपर्क क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार कार्यालयीन वेळेत संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# बारामती शासकीय रुग्णालयात पहिली अत्याधुनिक रोबोटिक गुडघा शस्त्रक्रिया यशस्वी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठपुराव्याला यश; 'मेडिअल पिव्होट' इम्प्लांटद्वारे शस्त्रक्रिया

बारामती : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय रुग्णालयात शहरातील पहिली अत्याधुनिक रोबोटिक कृत्रिम गुडघा सांधरोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. 'मेडिअल पिव्होट' तंत्रज्ञानाचा वापर करून पार पडलेली ही शस्त्रक्रिया बारामतीतील गरजू रुग्णांसाठी दिलासा देणारी ठरली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या वैद्यकीय तंत्रज्ञान क्षेत्रातील सततच्या पाठपुराव्यामुळे बारामतीसारख्या शहरात उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत आहेत. रोबोटिक प्रणालीच्या मदतीने करण्यात आलेली ही शस्त्रक्रिया ही एक क्रांतिकारी पावले असल्याचे आरोग्य वर्तुळात सांगितले जात आहे.



या शस्त्रक्रियेसाठी ऑर्थो पेडिक जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन डॉ. गिरीश भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली कुशल वैद्यकीय पथकाने काम केले. या वेळी Biorad Medisys या कंपनीचा मेडिअल पिव्होट गुडघा इम्प्लांट वापरण्यात आला. या प्रकारचा इम्प्लांट नैसर्गिक गुडघ्याच्या हालचालींची हुबेहुब नक्कल करतो व त्यामुळे रुग्णाला अधिक नैसर्गिक अनुभव मिळतो.या प्रणालीमुळे शस्त्रक्रियेतील अचूकता वाढते, इम्प्लांटचे स्थान अचूक निश्चित होते आणि रुग्णाच्या शरीररचनेनुसार उपचार सुसंगत होतात. रिअल-टाइम डेटा मिळाल्यामुळे सर्जनना अचूक निर्णय घेता येतात, हे या तंत्रज्ञानाचे खास वैशिष्ट्य आहे.

डॉ. भालेराव म्हणाले, बारामतीतील रुग्णांसाठी हे प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध करून देताना अत्यंत आनंद होत आहे. या इम्प्लांटच्या साहाय्याने वैयक्तिक गरजेनुसार अचूक गुडघा बसवता येतो. ही शस्त्रक्रिया बारामतीतील वैद्यकीय क्षेत्रात एक नवे पर्व सुरू करणारी आहे.

यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांनाही भविष्यात उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा सुलभपणे मिळणार आहेत.

# मुंबईत स्थायिक शिराळाधील कामगारांच्या अडचणी सोडवणार–रणधीर नाईक यांचे आश्वासन

## कालेर येथे मुंबईकर कार्यकर्त्यांच्या बैठकीत पुढाकार

शिराळा : नोकरीच्या निमित्ताने मुंबईत स्थायिक झालेल्या शिराळा मतदारसंघातील रहिवाशांच्या अडचणी सोडवण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करून आवश्यक सहकार्य केले जाईल, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रणधीर नाईक यांनी दिले.



मुंबईतील भिवंडी व कालेर परिसरात शिराळा तालुक्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. त्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी कालेर येथे झालेल्या बैठकीत नाईक बोलत होते. यावेळी यशवंत दूध संघाचे संचालक राजू नेर्लेकर, नाना भास्टे, नितीन मस्कर, विक्रम डफळे आदी उपस्थित होते.

नाईक म्हणाले, शिराळा तालुका डोंगरी आणि दुर्गम असल्याने रोजगाराची टंचाई आहे. त्यामुळे अनेकांना मुंबई, पुण्यासारख्या महानगरांत स्थलांतर करावे लागते. नवी मुंबई आणि भिवंडी येथेही आपल्या लोकांची संख्या मोठी आहे. तेथील कामगार विशेषतः माथाडी कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर आहे.

ते पुढे म्हणाले, माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांच्या माध्यमातून राज्य सरकारकडे विशेष लक्ष वेधले जाईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे ठोस पाठपुरावा करून मुंबईत स्थायिक झालेल्या शिराळा मतदारसंघातील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील. अनिल व सखाराम बिबेकर, अरुण गायकवाड, विष्णू व सुरेश मांडवेकर, विक्रांत पाटील, विकास पवार, साहिल पाटील, राहुल किनरे उपस्थित होते.

# इस्लामपूर येथे १८ जुलैला रस्सीखेच स्पर्धा

## प्रथम बक्षीस ५१ हजार रुपये

इस्लामपूर : सांगली जिल्ह्याचे युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १८ जुलै २०२५ रोजी इस्लामपूर येथे भव्य रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने शहरातील पक्ष कार्यालयासमोर सकाळी ९ वाजता ही स्पर्धा पार पडणार असून, याचे आयोजन शहराध्यक्ष शहाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

विजेत्या संघांना खालीलप्रमाणे रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांक : ५१,००० द्वितीय



क्रमांक : ३१,००० तृतीय क्रमांक : २१,००० चतुर्थ क्रमांक : ११,००० प्रत्येक संघात ८ खेळाडू अनिवार्य असून, संघातील खेळाडू संबंधित बूथचा असावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

स्पर्धा नॉकआउट किंवा लीग पद्धतीने खेळविण्यात येणार असून, पंचांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संघांनी गुरुवार, दि. १७ जुलै २०२५ पूर्वी इस्लामपूर येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष कार्यालयात नोंदणी करावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. सचिन कोळी, अभिजीत पाटील, राजेंद्र बाणेकर, रणजीत गायकवाड, स्वरूप मोरे, दिग्विजय पाटील, धीरज भोसले यांनी सहभाग घेतला.

# असंवेदनशीलतेमुळे दिव्यांग आयुक्तांचे निलंबन होणार

## मंत्री अतुल सावे यांचे विधानसभेत आश्वासन

## मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद शाळेवर प्रशासक नियुक्त

मुंबई : नागपूरच्या गुलशननगर येथील 'मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा' येथे सुरू असलेल्या अनियमितता, अन्याय व असंवेदनशील कारभाराच्या पार्श्वभूमीवर दिव्यांग आयुक्तांना निलंबित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे विधानसभेत अपंग कल्याण मंत्री ना. अतुल सावे यांनी स्पष्ट केले.

भाजपचे आमदार संदीप जोशी यांनी या प्रकरणात लक्षवेधी सूचना मांडून प्रशासनाच्या उदासीनतेकडे सभागृहाचे लक्ष वेधले. जोशी यांनी सांगितले की, शाळेतील कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नाही, संस्थाचालक कर्मचाऱ्यांकडून कर्ज फेडण्यासाठी वसुली



करत आहेत, बंदुकीचा धाक दाखवला जातो, व अनुदानाची रक्कम संस्थाचालक स्वतःकडे ठेवत आहेत. तक्रारी करूनही प्रशासनात कोणतीही ठोस कारवाई झाली नाही.जोशी यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वयंमूल्यांकन अहवालातील तफावत, सुनावणीत दिरंगाई, व दिव्यांग आयुक्तांच्या निष्क्रियतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. सभागृह सुरू असताना आयुक्तांना फोन करूनही उत्तर न मिळाल्याने ही असंवेदनशीलतेची परिसीमा आहे, असे त्यांनी नमूद केले.

या प्रश्नाला उत्तर देताना ना. सावे म्हणाले की, शाळेतील अन्यायाची सखोल चौकशी होईल आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. दिव्यांग आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठवून त्यांच्या निलंबनाची प्रक्रिया सुरू केली जाईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भूमिकाही संशयास्पद असल्याने त्यांच्यावरही कारवाईची शिफारस केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, आमदार जोशी यांच्या मागणीनुसार १६ जुलैपासून संस्थेवर प्रशासक नेमण्यात आले असल्याचे सुद्धा ना. सावे यांनी जाहीर केले. बंदुकीचा धाक दाखवण्याचा प्रकार अत्यंत गंभीर असून, प्रशासक याची सखोल चौकशी करून अहवाल सादर करतील आणि त्या आधारे संस्थाचालकावर फौजदारी कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# वाटेगाव–सुरुल साखर शाखेचा गळीत हंगाम सुरु

## देवराज पाटील यांच्या हस्ते रोलर पूजन

इस्लामपूर : माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या दूरदृष्टीतून उभारलेल्या राजारामबापू साखर कारखान्याच्या वाटेगाव-सुरूल साखर शाखेचा गळीत हंगाम २०२५-२६ या वर्षीही उत्साही वातावरणात सुरू झाला आहे.

शाखेच्या कार्यस्थळी झालेल्या समारंभात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष व माजी जि.प. अध्यक्ष देवराज पाटील यांच्या हस्ते पारंपरिक विधीनुसार रोलर पूजन करण्यात आले.




देवराज पाटील म्हणाले, देशातील सहकार क्षेत्रात स्वतंत्र शाखा या स्वरूपात वाटेगाव-सुरूल शाखेची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. गेल्या २२ वर्षांपासून ही शाखा यशस्वीपणे कार्यरत असून, यंदाचाही हंगाम अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक प्रभावीपणे पार पडेल, असा विश्वास वाटतो. समारंभास उपाध्यक्ष विजयराव पाटील, ऊस विकास समितीचे अध्यक्ष अमरसिंह साळुंखे, संचालक दिपक पाटील, रामराव पाटील, मनोहर सन्मुख, विकास पवार, सचिव डी.एम. पाटील, मुख्य शेती अधिकारी प्रशांत पाटील, कामगार संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष राजेंद्र चव्हाण, कार्याध्यक्ष तानाजी खराडे, चिफ इंजिनिअर संताजी चव्हाण, कामगार कल्याण अधिकारी महेश पाटील दाजी गावडे उपस्थित होते. अनिल पाटील, शिवाजी चव्हाण, वैभव पाटील, प्रकाश पाटील, संदीप गुरव, सचिन पडळकर, दिलीप कदम, विजय पाटील, आर.के. माने, अक्षय पाटील, सुरक्षा अधिकारी दत्तात्रय गायकवाड उपस्थित होते.

# शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेची माहिती भरावी

पुणे : शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षा-२०२५ च्या अनुषंगाने उमेदवारांनी त्याच संधीत परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रक अथवा अन्य वैध प्रमाणपत्र एक महिना कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. अद्यापपर्यंत माहिती सादर न केलेल्या उमेदवारांनी तत्काळ माहिती सादर करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे. ही माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेला ईमेल, पोस्ट अथवा हस्तपोच सादर करताना 'शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षा- २०२५' परीक्षेचा नोंदणी क्रमांक व बैठक क्रमांक नमूद करावा किंवा https://www.mscepune.in/dtedola/T-IT2025Info-ppear.aspx या लिंकवर माहिती भरुन विहित मुदतीत सादर करावी. माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, असेही श्रीमती ओक यांनी कळविले आहे.

# डॉ.स्वाती पाटील यांची भाजप राज्य परिषदेवर नियुक्ती

शिराळा : भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव डॉ. सौ. स्वाती दीपक पाटील यांची भाजप महाराष्ट्र राज्य परिषदेच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल विविध महिला संघटनांच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.



## महिला संघटनांकडून सत्कार

या निमित्ताने संकल्प महिला मजूर बांधकाम कामगार संघटना, राजमाता बहुउद्देशीय महिला सेवाभावी संस्था, मलकापूर, वैष्णवी महिला बचत गट, रयत शिक्षण संस्था सखी सावित्री समिती, मलकापूर यांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. या निवडीमुळे शाहूवाडी व पन्हाळा या तुलनेने लहान तालुक्यांतून एका कार्यकर्त्या महिलेची भाजप राज्य परिषदेवर निवड होणे, हे सर्वांसाठी गौरवाचे असल्याचे मत संघटनेच्या अध्यक्षा माधुरी देसाई यांनी व्यक्त केले. आज तळागाळातील महिलांसाठी ही प्रेरणादायी बाब असून, अशा कार्यकर्त्यांचे समाजात योगदान मोठे आहे.

दिपाली कापसे, तेजस्विनी जगताप, सुनिता कापसे, सरीता कांबळे उपस्थित होत्या. डॉ. स्वाती पाटील यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वारुंजी पुनर्वसनासाठी ११ वर्षांपासून प्रतीक्षेत असलेले बाधित प्लॉट वाटप व पॅकेज वाटपाची मागणी तीव्र





कराड (प्रतिनिधी) - कराड विमानतळ विस्तार प्रकल्पात जमिनी गमावलेले वारुंजी गावातील बाधित शेतकरी व रहिवासी २०१४ पासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. पुनर्वसनासाठी निश्चित करण्यात आलेल्या वारुंजी गावठाणालगतच्या २ हेक्टर ९० आर जमिनीतील प्लॉटचे तातडीने वाटप करावे, तसेच पाच लाख रुपयांच्या पुनर्वसन पॅकेजचे वितरण लवकरात लवकर करावे, अशी मागणी बाधितांनी उपविभागीय अधिकारी कराड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या प्रकरणासंदर्भात बाधित शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, दि. ७ जुलै २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत प्रत्येक खातेदाराला पाच लाख रुपयांचे पुनर्वसन पॅकेज देण्याचे ठरवले होते. त्यानुसार शासनाकडून ११ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन आपल्या कार्यालयात वर्गही करण्यात आला आहे. मात्र अद्याप ही रक्कम वितरित झालेली नाही.

दरम्यान, विमानतळाच्या शेजारील २ हे. ९० आर क्षेत्रात पुनर्वसनाची व्यवस्था करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून, २९ नोव्हेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्र्यांनी झालेल्या बैठकीत यास मान्यता दिली आहे. यासाठी २० कोटी रुपये जमीन संपादनासाठी आणि ७ कोटी १५ लाख रुपये इतर सुविधांसाठी मंजूर करण्यात आले आहेत. तरीदेखील प्रत्यक्ष प्लॉट वाटपास विलंब होत असून, त्यामागे काही राजकीय दबाव कारणीभूत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

१५ जुलै २०१४ रोजी बी. जी. शिर्के यांच्या माध्यमातून या जमिनीचे मोजणी कार्य पूर्ण झाले होते. त्यानंतर विमानतळ विकास कंपनीकडून व जिल्हा प्रशासनाकडून या जमिनीची अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण करून ७/१२ उताऱ्यावर कंपनीचे नाव दाखल करण्यात आले आहे. तरीही ११ महिने उलटून गेले तरी पुनर्वसन प्रक्रियेस गती मिळालेली नाही. विशेष म्हणजे, ३४ घरधारकांचे वास्तव्यही विमानतळ विस्तार प्रकल्पात बाधित झाले असून, त्यांना देखील या पुनर्वसन क्षेत्रात घरकुले देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र अद्याप प्रत्यक्षात कोणतीही कारवाई झालेली नाही. बाधितांनी स्पष्ट चेतावणी दिली आहे की, जर तातडीने प्लॉट वाटप आणि पॅकेज वितरणाची प्रक्रिया सुरू झाली नाही, तर ते उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन किंवा उपोषण करण्यास भाग पडतील.

तसेच न्यायालयातही याबाबत दाद मागण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. कराड विमानतळ विस्तारवाढ बाधीत शेतकरी समितीचे अध्यक्ष नामदेव पाटील, प्रभाकर शिंदे, शिवाजीराव पाटील, प्रकाश चव्हाण यांच्यासह ७० ते ८० लोक उपस्थित होते. या मागणीची प्रत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी व विमानतळ विकास कंपनीच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

# आरआयटीचे विद्यार्थी करणार पॅरिसमध्ये टेक एमबीए जागतिक करिअरसाठी सुवर्णसंधी



इस्लामपूर : इस्लामपूर येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या स्वायत्त महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांना पॅरिस स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी अँड बिझनेस (फ्रान्स) येथे टेक एमबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे. यामुळे तंत्रज्ञान व्यवस्थापन क्षेत्रात जागतिक करिअरसंधीची दारे खुली झाली आहेत.

अभय पाटील, सानिका पाटील, अर्थव मगदूम, संकल्प खोत आणि अपूर्वा गायकवाड या विद्यार्थ्यांनी आरआयटीमधील एक वर्ष पूर्ण करून आता दुसऱ्या वर्षासाठी पॅरिसला जाण्याचा मार्ग निवडला आहे. या अभ्यासक्रमासाठी आरआयटीने फ्रान्समधील पॅरिस स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी अँड बिझनेस या संस्थेशी सामंजस्य करार केला असून, डॉ. आरमंड डेरहे यांनी आरआयटीला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अभय केळकर, डॉ. कृष्णाजी पाटील उपस्थित होते. आभार दिग्विजय पाटील यांनी मानले.

# लोकशाही दिनाचे २१ जुलै रोजी आयोजन

पुणे : पुणे महानगरपालिका समाविष्ठ ३४ गाव समितीचे सदस्य विकी शिवाजी माने यांनी पुणे शहर तहसीलस्तरीय लोकशाही दिनाचे २१ जुलै रोजी सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत बुध्दविहार बस थांबा, रेणुका माता मंदिर जवळ, केशवनगर, मुंढवा येथे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार सूर्यकांत येवले यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री यांनी सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे या करिता सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. या कारणास्तव नागरिकांना शासनाच्या विविध योजना उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच त्यांच्या स्थनिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिवस हा शासन आपले दारी म्हणून आयोजित करण्यात यावा असे या परिपत्रकाद्वारे आदेशित करण्यात आलेले आहे.


# सगाम कॉलेजच्या पुष्पकराज कुलकर्णींचे सीए परीक्षेत यश



कराड : रयत शिक्षण संस्थेच्या सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड येथील विद्यार्थी पुष्पकराज राहुल कुलकर्णी यांनी झालेल्या सीए फायनल परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी एकूण ६०० पैकी ३१४ गुण मिळवून सीए ही पदवी प्राप्त केली असून आर्थिक अहवाल सादरीकरण आणि प्रगत आर्थिक व्यवस्थापन या विषयांमध्ये विशेष प्राविण्य मिळवले आहे.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व स्थानिक व्यवस्थापन समितीचे प्रमुख ॲड. रवींद्र पवार, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी त्यांचे विशेष अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामागे वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.एस.एस.पवार, माजी उपप्राचार्य प्रा.आर.वाय.पाटील, उपप्राचार्य एस.एस. नांगरे यांचे तसेच विभागातील सर्व प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पुष्पकराजच्या या यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण असून तो सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायक ठरला आहे.

# डॉ.दीपक टिळक निधनाने पत्रकारिता क्षेत्रावर शोककळा-केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे



नवी दिल्ली : दैनिक 'केसरी' वर्तमान पत्राचे कार्यकारी संपादक डॉ. दीपक टिळक यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाबद्दल युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या केंद्रीय राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांनी दुःख व्यक्त केले असून, त्यांचे कार्य प्रेरणादायी होते, अशा शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली आहे.रक्षा खडसे यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानी पुण्याशी आणि 'केसरी'सारख्या ऐतिहासिक वर्तमानपत्राशी निगडित असलेले डॉ. दीपक टिळक यांचे निधन हे पत्रकारिता आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मोठी हानी आहे.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेले 'केसरी' हे वर्तमानपत्र भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे साक्षीदार राहिले आहे. त्या ऐतिहासिक वारशाचे डॉ. दीपक टिळक यांनी अत्यंत जबाबदारीने आणि निष्ठेने संवर्धन केले. पत्रकारितेतील त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे. राज्य व देशाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. 'केसरी'च्या माध्यमातूनच नव्हे तर विविध उपक्रमांतून त्यांनी समाज घडवण्यात योगदान दिले. त्यांच्या निधनाने 'केसरी' परिवार आणि टिळक कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना, असे रक्षा खडसे यांनी शोक संदेशात म्हटले आहे.

## उंब्रज पोलिसांची चोख कामगिरी

# घरफोडीप्रकरणी आरोपी गजाआड, संपूर्ण मुद्देमाल जप्त



उंब्रज : उंब्रज पोलिसांनी घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला अवघ्या काही दिवसांत अटक करून चोरी गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

उंब्रज पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्र. ७०/२५ नुसार, फिर्यादीच्या बंद घरात अज्ञात व्यक्तीने प्रवेश करून दोन चांदीचे छल्ले आणि एचपी कंपनीचा लॅपटॉप असा अंदाजे ३६ हजार रुपयांचा ऐवज चोरीस नेला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असतानाच पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून लक्ष्मीनगर, उंब्रज येथील संकेत संतोष चव्हाण (वय २०) याच्यावर संशय घेतला. संशयितास ताब्यात घेऊन कौशल्यपूर्ण तपास केला असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी त्याच्याकडून चोरी गेलेले दोन्ही चांदीचे छल्ले आणि लॅपटॉप असा एकूण ३६ हजार रुपयांचा संपूर्ण मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर व कराडचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय रवींद्र भोरे, पीएसआय रमेश ठाणेकर, पो.ह. सचिन मुळे, संजय धुमाळ, दिनेश भोसले, पो.कॉ. प्रशांत पवार, श्रीधर माने, मयूर थोरात व राजू कोळी यांनी केली.

# सातारा जिल्ह्यात ठेकेदारांची देणी देण्याचा महायुतीला पडला विसर

सातारा : कोणत्याही सार्वजनिक उपक्रम राबवताना सर्वांचा हातभार मोलाचा आहे. त्याचबरोबर निविदामध्ये नमूद केल्याप्रमाणे काम करणाऱ्या ठेकेदारांची ही योगदान आहे. हे नाकारून चालणार नाही. परंतु, सध्या सातारा जिल्ह्यात सुमारे साडे चारशे कोटी रुपये काही ठेकेदारांची देणे देण्याचा राज्यकर्त्यांना विसर पडला आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी वर्गाला सुद्धा न्यायालय प्रक्रियेसारखी तारीख पे तारीख घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही.

सातारा जिल्ह्यातील ठेकेदारांची नेमकी संख्या ही नेत्यांच्या वाढदिवसाच्या फलकातून निश्चित करता येत नाही. शासकीय आकडेवारीमध्ये उपलब्ध नाही. तथापि, सातारा जिल्ह्यामध्ये बांधकाम, रस्ते, वीज, इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये काम करणारे अनेक ठेकेदार आहेत. सुशिक्षित बेरोजगार पासून ते सेवानिवृत्त अधिकाऱ्यांपासून अनेक जण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या यामध्ये सामील झाले आहेत.



सार्वजनिक बांधकाम विभाग, जीवन प्राधिकरण , कृषी विभाग, पाटबंधारे विभाग, वन विभाग,सातारा जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग माध्यमातून अनेक लहान-मोठे ठेकेदार बांधकाम, रस्ते, वीज, पाणीपुरवठा, इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये काम करणारे अनेक लहान-मोठे ठेकेदार कार्यरत आहेत. राजकीय शिफारसीमुळे काही ठेकेदार शासनाकडे नोंदणीकृत नसतानाही उप ठेकेदार म्हणून काम करतात. कामे पूर्ण होऊनही त्यांना देख न मिळाल्यामुळे काही ठेकेदार व्यवसाय सोडून गेले, तर काहीनी नवीन पर्याय स्वीकारला आहे. गेल्या सहा महिन्यापासून राज्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर संस्था, विकासक, बांधकाम विभाग, ग्राम विकास, नगर विकास, जलसंधारण, जलसंपदा, जलजीवन योजनेअंतर्गत काही कामे पूर्ण झाली असून काही उद्घाघाटनाच्या प्रतीक्षेत आहेत. कर्ज काढून ठेकेदार बनलेल्या काही ठेकेदारांना वर्षभर देयक मिळाले नाहीत. तर ज्यांनी काम न करता बिल सादर केलेले आहे. त्यांना मात्र फारशी झळ बसत नाही. ज्यांनी निविदाच्या निकषाप्रमाणे कामे पूर्ण करून विकास कामांची बिले गेल्या दहा महिन्यापासून मिळालेली नाहीत. याबाबतची नाराजी व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने सातारा जिल्हा शाखेच्या वतीने ठेकेदारांच्या शिष्टमंडळाने साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. सध्या पावसाळी अधिवेशन होत असून दिवाळीपूर्वी सर्व देयक देण्याच्या हालचाली वित्त विभागाने केल्याची माहिती एका ज्येष्ठ मंत्र्याने दिल्याचे समजते.

# आळंदीत 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद'चे आयोजन

पुणे : 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद'१९ व २० जुलै २०२५ रोजी हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील ६० कीर्तनकार आणि १५० सरपंच सहभागी होणार आहेत. अशी माहिती परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील, हभप यशोधन महाराज साखरे आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून ही गोलमेज परिषद होत आहे. या परिषदेचा शुभारंभ शनिवार, १९ जुलै रोजी दुपारी ३.०० वा. होणार आहे. या समारंभासाठी राज्याचे अन्न व औषधे प्रशासन विभागाचे मंत्री श्री.नरहरी झिरवाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच या सत्रात विधान परिषदेचे सदस्य श्री. श्रीकांत भारतीय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, खांडबहाले डॉट कॉमचे निर्माते डॉ. सुनिल खांडबहाले हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.तसेच २० जुलै रोजी होणा-या वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल या विषयावर सकाळी ९.३० वा. होर्णाया तृतीय सत्रामध्ये राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सामाजिक कार्य मंत्री आशिष शेलार हे प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून उपस्थित राहतील. या वेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सल्लागार वैभव डांगे व अभय टिळक उपस्थित राहणार आहेत.वारकरी संप्रदायाची २१व्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची दिशा, स्वरूप, समस्या व आव्हाने आणि निराकरणाची संभाव्य कृतिशील उपाययोजना हा या परिषदेचा प्रमुख विषय असणार आहे. परिषदेत वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून होत असलेले मौलिक लोककल्याणाचे कार्य, आध्यात्मिक प्रबोधनाबरोबरच लोक जीवनातील विविध दैनंदिन समस्यांच्या निराकरणासाठी अधिकाधिक कसे उपयोगी होईल. या विषयावर विविध अंगाने विचारमंथन करून सामाजिक प्रबोधनाचे नवीन विषय व कार्याची निश्चित दिशा ठरविली जाणार आहे.

# डी.आर.जाधव यांची महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड



शिराळा : शिराळा तालुक्यातील चिंचोली गावचे सुपुत्र, पोलीस उपनिरीक्षक व राष्ट्रपती पदक प्राप्त मा. डी. आर. जाधव यांची महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. ही निवड पुणे येथे पार पडलेल्या परिषदेच्या निवडणुकीत करण्यात आली. कुस्ती महर्षी आणि परिषदेचे सरचिटणीस बाळासाहेब लांडगे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. उपाध्यक्ष पदासाठी डी. आर. जाधव यांच्याविरोधात कोणताही अर्ज न आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड जाहीर झाली.याच निवडणुकीत हणमंत भाऊ गावडे यांची अध्यक्षपदी तर ललितजी लांडगे यांची सरचिटणीसपदी निवड झाली आहे. सर्व निवडी २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी वैध असतील, असे परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या निवडणुकीत ठाणे शहर तालीम संघाचे अध्यक्ष मा. सुरेशभाई ठाणेकर, उपाध्यक्ष रमाकांत पाटील, चिटणीस तुकाराम खुटवड यांनी प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला होता.

# पडळकर आणि आव्हाडांचे कार्यकर्ते भिडले

मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशनाच्या आजच्या शेवटच्या दिवशी एक धक्कादायक घटना घडली आहे. गेल्या काही दिवसांपासून भाजपाचे आमदार गोपिचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार गोपिचंद पडळकर यांच्यात सुरू असलेल्या वाकयुद्धाची परिणती बुधवारी एकमेकांना शिविगाळ करून धमकावण्यात झाली होती.

# पाटण पंचायत समितीतील आंबेडकर अभ्यासिका तातडीने खुली करा-रिपब्लिकन सेनेची मागणी



पाटण : लोकनेते बाळासाहेब देसाई भवनातील पंचायत समिती पाटण इमारतीमध्ये शासनाने उभारलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक अभ्यासिका गेल्या काही वर्षांपासून कुलूपबंद असून, अभ्यासिकेच्या जागेत इतर साहित्य ठेवण्यात आले आहे. ही अभ्यासिका तातडीने जनतेसाठी खुली करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन सेना पाटण तालुकाध्यक्ष सचिन कांबळे यांनी केली आहे.

पाटण तालुक्यातील युवक, युवती, महिला आणि अभ्यासकांकडून अभ्यासिकेच्या उपलब्धतेविषयी वारंवार मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर कांबळे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले. या निवेदनात अभ्यासिकेवरील कुलूप हटवून ती तातडीने शासकीय वेळेनुसार सर्वसामान्यांसाठी खुली करावी, तसेच आत साठवलेले साहित्य इतरत्र हलवावे, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

यावेळी रिपब्लिकन सेनेचे तालुका पदाधिकारी उपस्थित होते. अभ्यासिका ही शैक्षणिक सुविधा असून ती बंद ठेवणे हे जनहिताविरोधी आहे, त्यामुळे संबंधित प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी आग्रही भूमिका या वेळी घेण्यात आली.